डॉ. किरीट सोमय्या -माजी खासदार
चार्टर्ड अकाउंटंट, पी.एचडी.
राष्ट्रीय सचिव

भारतीय जनता पार्टी

नोव्हेंबर १६, २०११

**कल्पतरु बिल्डर्सचा मुंबई जमीन घोटाळा**
**घोटाळ्यात संरक्षण मंत्रालयाचा सहभाग असल्याचे कॅगचे निरीक्षण**

- डॉ. किरीट सोमय्या

आता हे सिद्ध झाले आहे कि कल्पतरु बिल्डर्सने कांदिवली येथील संरक्षण खात्याची जमीन बळकावली आहे. कॅग (लेखा परिक्षक) म्हणतात कि संरक्षण खात्याची जमीन संरक्षण राज्यमंत्री, महाराष्ट्र सरकार आणि बिल्डर यांच्या संगनमताने कल्पतरु बिल्डर्सला सूपीर्द करण्यात आली.

भाजपचे राष्ट्रीय सचिव आणि स्कॅम एक्स्पोज समितीचे अध्यक्ष डॉ. किरीट सोमय्या यांनी आज मुंबईतील संरक्षण खात्याच्या जमीनीच्या घोटाळ्याबाबतचा कॅगचा प्राथमिक अहवाल प्रसिद्धीला दिला. हे दुसरे तिसरे काही नसून आदर्श घोटाळा २ आहे.

कॅगचा अहवाल म्हणतो :
''आणखी पुढे, लेखा परीक्षणातून असेही उघडकीला आले आहे कि सीओडीने रक्षक तैनात करून विकासाला विरोध केला तेव्हा, क्यूएमजीच्या शाखेने डिसेंबर १०, २०१० रोजी एलएमएला 'सर्व अडथळे तातडीने दूर करण्याच्या आणि कायदेशीर मालकाला नियोजित विकास पुढे करू देण्याच्या सूचना दिल्या'. या सूचना तत्कालीन सीओएएस च्या हस्तक्षेपानंतर देण्यात आल्या. जमीन लष्कराच्या ताब्यात असल्यामुळे, खटला दाखल करणेच योग्य ठरले असते. परंतु कोणताही खटला दाखल करण्यात आला नाही''.

**संरक्षण मंत्रालयाने लष्करी अधिकाऱ्यांना भूखंड कल्पतरु बिल्डर्सला सोपविण्यास सांगितले.**

लेखा परिक्षण अहवाल म्हणतो -

''सीओडीने रक्षक तैनात करून विकासात अडथळा आणल्यामुळे, मे. निओ फार्माने राज्य उत्पादन राज्य मंत्री (आरयुआरएम) कडे तक्रार केली. मंत्र्यांच्या स्वीय सचिवाने १५ नोव्हेंबर २००७ रोजी लष्कर प्रमुखांच्या सचिवालयाला 'उचित' कारवाईसाठी प्रकरण चीफ ऑफ आर्मी स्टाफपुढे नेण्यासाठी लिहीले. नंतरच्या दिवशी, म्हणजे १६ नोव्हेंबर २००७ रोजी तत्कालीन चीफ ऑफ आर्मी स्टाफ यानी लिहिले 'प्लीज प्रोसेस', आणि पुढील कारवाईसाठी फाइल क्वार्टर मास्टर जनरल( क्यूएमजी)च्या शाखेकडे पुढे पाठवली. डिसेंबर १०, २००७ रोजी क्यूएमजीने आरयुआरएमच्या स्वीय सचिवाला कळविले कि स्थानिक लष्करी अधिकाऱ्यांची (एलएमए) कारवाई गैरसमजाचा आणि त्यांच्या आणि डिफेन्स इस्टेटस् ॲथॉरिटीजमधील सुसंवादाच्या अभावाचा परिणाम असल्याचे दिसत आहे. त्यानी पुढे असेही म्हटले आहे कि एलएमला सर्व अडथळे तातडीने दूर करण्याच्या आणि कायदेशीर मालकाला त्याच्या विकासाचे काम पुढे सुरू करू देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. मुंबई सब एरियाच्या निर्देशांच्या आधारे, सीओडीने रक्षक आणि बोर्डस् काढून घेतले''.

संरक्षण मंत्रालयाने आता घोटाळा कबूल केला आहे आणि कॅगला कळविले आहे कि
''कल्पतरु बिल्डर्सच्या संरक्षण खात्याच्या जमीन घोटाळ्यात कोर्ट ऑफ इनक्वायरीचा आदेश देण्यात आला आहे ''.

भाजप नेता डॉ. किरीट सोमय्यांनी मागणी केली आहे कि-

१. संरक्षण उत्पादन राज्य मंत्री राव इंद्रजित सिंग यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी.
२. राज्य संरक्षण मंत्र्यानी त्यांच्या स्वीय सचिवाला मुंबईच्या लष्करी अधिकाऱ्यांना संरक्षण खात्याची जमीन कल्पतरु बिल्डर्सकडे सोपविण्यास सांगण्याचा आदेश दिला. संरक्षण मंत्री श्री. अँथनी यांनी स्पष्टीकरण दिलेच पाहिजे.
३. सीबीआयला कल्पतरु बिल्डर्स, राज्य संरक्षण मंत्र्यांचे स्वीय सचिव, संरक्षण खात्याचे अधिकारी, जिल्हाधिकारी, महाराष्ट्र सरकार, यांच्याविरुद्ध भा.दं.सं, कलमे १२०(बी), ४०६, ४२०, ४६५ खाली खटला दाखल करण्यास सांगावा.
४. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी जिल्हाधिकारी, महसूल खात्याचे अधिकारी आणि मुंबई महापालिकेला कारवाई करण्यास आणि कल्पतरु बिल्डर्सला दिलेले सर्व परवाने रद्द करण्यास सांगावे.
५. कल्पतरु टॉवर्समधील निष्पाप खरेदीदारांना संरक्षण देण्यात यावे.

***प्रसिद्धी सचिव***